
INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 6 | JULY - 2023

# 'उपेक्षितांचे अंतरंग' : उपेक्षितांच्या अंतरंगातील वेदनेचा वाङ्मयीन आलेख

डॉ. आनंदा गांगुर्डे
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
विद्या प्रतिष्ठानचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, विद्यानगरी, बारामती.
जि. पुणे.




श्री. म. माटे हे मराठी साहित्यातील, सामाजिक चिंतनावर लेखन करणारे समर्थ लेखक आहेत. त्यांचा जन्म २ सप्टेंबर १८८६ रोजी झाला तर मृत्यू २५ डिसेंबर १९५७ रोजी झाला. श्रीपाद महादेव माटे यांचे बहुतांश लेखन सामाजिक स्वरूपाचे आहे. निरनिराळ्या समाजातील व्यक्तींच्या जीवनात असणारे दुःख, उच्चवर्णीय समाजाने तळागाळातील समाजाची केलेली उपेक्षा, अशा उपेक्षितांच्या अंतरंगाला स्पर्श करून त्यांचे दुःख समाजासमोर आणण्याचे महान कार्य श्री. म. माटे यांनी केले. त्यांची साहित्यसंपदा मोठी आहे. रसिकांच्या हृदयाला भिडणाऱ्या साहित्याची निर्मिती त्यांनी केली. 'उपेक्षितांचे अंतरंग', 'अनामिका', माणुसकीचा गहिवर, 'भावनांचे पाझर', इ. ललित कथासंग्रह, 'पश्चिमेचा वारा' ही एकमेव कादंबरी, 'चित्रपट' व 'मी व मला दिलेले जग' अशी दोन आत्मचरित्रे याबरोबरच काही प्रबंधात्मक, चरित्रात्मक, वर्णनात्मक, निबंधात्मक लेखन अशी विपुल साहित्यसंपदा श्री. म. माटे यांच्या नावावर आहे. बहुविध स्वरूपाचे ललित लेखन करणारे, वैचारिक लेखन करणारे स्वतंत्र प्रज्ञेचे शिल्पकार, श्रेष्ठ साहित्यिक, नामवंत प्राध्यापक, अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य करणारे कृतिशील निष्ठावान समाजसेवक इ. असे अनेक विशेष श्री. म. माटे यांचे सांगता येतील. त्यांनी आपल्या साहित्यातून तळागाळातील समाजाचे म्हणजे महार, मांग, चांभार, रामोशी, कातकरी, हेलकरी, निराधार स्त्री अशा समाजातील व्यक्तींचे, त्यांच्या सुखदुःखाचे अत्यंत प्रत्यकारी चित्रण सहृदयतेने केले आहे. या वास्तवाबद्दल डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात की, "त्यांच्या 'सगाजी बुवा', 'अस्पृश्यांच्या डायरीतील पाने', 'नाथनाक आणि देवकाई यांची काळझोप' यासारख्या कथा पाहिल्या तर त्यात आजच्या दलित कथेची बीजेही त्यांच्या कथेतून आलेली दिसतील... माटे या जीवनाविषयी लिहिताना अस्वस्थ होऊन लिहितात हे खरे असले तरी त्यांच्या दारिद्र्याला, भयाण परिस्थितीला ज्या सामाजिक विषमतेतून हे दुःख, भोग निर्माण झाले त्या वर्णाधिष्ठित समाजव्यवस्थेविरुद्ध ते प्रखरपणे लिहू शकलेले नाहीत."❶ (डॉ. वासुदेव मुलाटे, 'ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास', साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद. प्रथमावृत्ती - जानेवारी १९९२, पृ. क्र. १४, १५)

आपल्या प्रज्ञेला सतत प्रज्वलित करून मराठी वाङ्मयावर एक चिरंतन मुद्रा त्यांनी उमटवलेली आहे. म्हणूनच थोर ज्ञानोपासकात माटे यांची गणना केली जाते. साधारणपणे इ. स. १९४०च्या आसपास श्री. म. माटे यांचे लेखन सुरू झाले. समकालीन कथालेखनापेक्षा श्री. म. माटे यांची लेखनप्रेरणा वेगळी होती. श्री. म. माटे यांना मानवी जीवनातील एक उपेक्षित स्तर नेहमी दिसत असे. जो दळलेला अहे, पिळलेला आहे, भरडलेला आहे, ज्याच्यावर अन्याय होतो आहे, जो समाजाकडून उपेक्षिला गेला आहे अशा 'उपेक्षितांच्या अंतरंगाला' त्यांनी स्पर्श केला आहे. प्रा. श्री. म. माटे यांच्या भूमिकेवर भाष्य करताना 'दलित साहित्य : उद्गम आणि विकास' या ग्रंथात डॉ.

योगेंद्र मेश्राम म्हणतात, "याच काळात अत्यंत सहानुभूतीने व जाणीवपूर्वक 'उपेक्षितांच्या अंतरंगा'त शिरणारे प्रतिभावान लेखक श्री. म. माटे यांनी दलितांच्या दुःखाला प्रभावीपणे वाचा फोडली आहे. आतापर्यंतच्या मध्यमवर्गीय पांढरपेशी जीवनाच्या जाणिवा ओलांडून माटेंनी ज्या तळमळीने 'अस्पृश्यांचा प्रश्न' हाती घेतला त्याच प्रामाणिक सहृदयतेने 'उपेक्षितांचे अंतरंग' रंगविले. बन्सीधर, पिऱ्या, नाथनाक आणि देवकाई, सई, सावित्री, पुरंदरचा नामा इ. उपेक्षित, दलित व्यक्तिचित्रे रेखाटून माट्यांनी दलितांच्या व्यथा-वेदना व दुःखे कथेतून प्रभावीपणे बोलकी केलेली आहेत याची नोंद इथे घेतली पाहिजे. ते 'शेवंतीचा खराटा' या कथेत लिहितात, 'तू गेलीस तरी तुझी ही गटारापाशी लोळणारी नातवंडे खरोखरच जागची उठतील. ती माना वर करून चालू लागतील. ती आक्रोश करतील. स्वाभिमानाचे कडकडीत शब्द ती बोलू लागतील. तुझी लेकरे समाजावर चवताळून उठतील. पण समाज जाब देतो आहे असे दिसते.' पण माटे यांचे हे स्वप्न पूर्ण होत आहे असे दिसत नाही. काळाचा ओघ बदलला. 'धर्म' बदललेला नाही. तोंडची भाषा बदलली. तिचे रूपतत्त्व तेच आहे. पण हे काही माटे यांच्या लेखनाचे उणेपण नोहे. त्यांनी सारख्याच तळमळीने 'उपेक्षितांचे अंतरंग' नंतर 'माणुसकीचा गहिवर' लिहिली. 'कशाचा संसार' मध्ये दलित स्त्रीची व्यथा चितारली. 'एका अस्पृश्याच्या डायरीतील पाने' या कथेतील तानी उच्चवर्णियाला असा खडा सवाल करते की, 'गाढवाच्या पोराला बामनाने कावडीचे पाणी पाजले अन् आपल्याला गावच्या हेळावर कावं भरू देत नाही? असे दलित जाणिवेतून लिहिणारे माटे दलितांना विसरता येत नाही. त्यांच्या लेखणीची तळमळ आणि त्यामागची सामाजिक जाणीव खरी होती, हे नाकारता येत नाही."❷ (डॉ. योगेंद्र मेश्राम, 'दलित साहित्य उद्गम आणि विकास', मंगेश प्रकाशन, नागपूर. प्रथम आवृत्ती - ११ मे १९९८, पृ. क्र. १५०) उपेक्षित स्तरावर जाऊन त्यांनी त्यांचे जग आतून पाहिले. केवळ बाहेरून सहानुभूती दाखविण्यासाठी ते उपेक्षितांकडे वळले नाहीत. तिकडे वळल्यावर त्यांना जे अनुभवाला आले, तेथे त्यांना जी माणसे दिसली तीच त्यांनी आपल्या कथेतून अभिव्यक्त केली. या उपेक्षितांच्या जीवनातील घटना जशा अर्थपूर्ण आहेत तसेच त्या घटनेतून जगणारी मनेही अर्थपूर्ण आहेत. अंतरंग म्हणजे 'आतला रंग'! अर्थातच मनाला झालेल्या वेदना, उपेक्षितांच्या मनातील वेदना माटे यांनी 'उपेक्षितांचे अंतरंग'मधून आविष्कृत केल्या आहेत. त्यांना उपेक्षित जीवन आणि या जीवनात वावरणारी मने एकाच वेळेस जाणवली. म्हणूनच त्यांचा अनाथ बन्सी, दरोडेखोर असला तरी प्रामाणिक सत्या, फसवला गेलेला विज्या, मुक्याने मेलेली सावित्री, अंधश्रद्धेच्या माध्यमातून बळी गेलेले नाथनाक आणि देवकाई, प्रांजळ कथन करणारा नामा, गोरगरीबांविषयी सहानुभूतीने वागणारे श्रीनिवासराव, विधवा असूनही खंबिरपणे उभी राहणारी सई, अस्पृश्यतेचे चटके सहन करणारा तबा ही सर्व माणसे आपल्या व्यक्तिमत्त्वासह उभी राहतात. त्यांची मनं आपल्या मनाला भिडतात. शेवटी वाचकांच्याही मनात या सर्व उपेक्षित माणसांविषयी सहानुभूतीची लाट निर्माण होते.

## 'उपेक्षितांचे अंतरंग' : स्वरूप आणि वैशिष्ट्ये -

'उपेक्षितांचे अंतरंग' हा श्री. म. माटे यांचा ललित कथांचा संग्रह आहे. यात 'बन्सीधर' तू आता कोठे रे जाशील ?', 'तारळखोऱ्यातील पिऱ्या' 'सतीचे शस्त्र', 'सावित्री मुक्याने गेली', 'पुरंदरचा नामा', 'कशाचा संसार', 'अस्पृश्यच्या डायरीतील पाने', 'नाथनाक आणि देवकाई यांची काळझोप', इ. त्यांच्या अविस्मरणीय वाटाव्यात अशा आहेत. वाङ्मयीनदृष्ट्या महत्त्वपूर्ण अशा या कथा आहेत. जीवनमूल्य आणि वाडमयमूल्य यांचा सुरेख संगम या कथांमध्ये झालेला आहे. म्हणूनच मराठी वाचकांनीच नव्हे तर मराठी समीक्षकांनी या कथासंग्रहाला डोक्यावर घेतले. प्रा. श्री. म. माटे यांच्या कथेची समीक्षा करताना इंदुमती शेवडे म्हणतात, "खेडेगावातील व खालच्या स्तरातील लोकांचे अत्यंत सहानुभूतीपूर्ण व सच्चे चित्रण माट्यांनी प्रथम मराठी कथेत आणले. व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेची ती एक प्रकारे नांदीच होती असे म्हणता येईल. पण माट्यांची भूमिका ही त्या काळाला अनुसरून समाजसुधारणेची तीव्र तळमळ असलेल्या मध्यमवर्गीय व दलित खेडूत जीवनात 'बाहेरून' आलेल्या माणसाची होती. त्यांच्यापैकीच एक असणाऱ्याची नव्हती. म्हणून त्या जीवनाशी एकरूपता त्यांच्यात नव्हती. त्यामुळे माट्यांची कथा त्या जीवनाच्या विशिष्ट पातळीपर्यंतच जाऊ शकली."❸ (इंदुमती शेवडे, 'मराठी कथा : उगम आणि विकास', सोमैया पब्लिकेशन्स, मुंबई, संक्षिप्त व सुधारित आवृत्ती १९८२, पृ. क्र. १५२) लोकप्रियतेच्या

सर्व कसोट्या या पुस्तकाने ओलांडल्या आहेत. याचे प्रमुख कारण असे की या कथांचे स्वरूप आगळेवेगळे आहे, अभिव्यक्ती वैशिष्ट्यपूर्ण आहे.

ग्रामीण साहित्य चळवळीचे निर्माते ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक डॉ. आनंद यादव यांनी श्री. म. माटे यांना 'ग्रामीण कथेचे हरिभाऊ' असे संबोधले आहे. हरिभाऊ आपटे यांच्यापूर्वी मराठी कादंबरी अस्तित्वात असूनही 'आधुनिक मराठी कादंबरीचे जनकत्व' हरिभाऊ आपटे यांच्याकडे जाते. त्याच न्यायाने मराठी ग्रामीण कथेचे जनकत्व श्री. म. माटे यांच्याकडे जाते. ग्रामीण कथेचा इतिहास पाहिला असता पहिली ग्रामीण कथा म्हणून हरिभाऊ आपटे यांच्या 'काळ तर मोठा कठिण आला' या कथेचा नामनिर्देश केला जातो. श्री. म. माटे यांच्या कथा मुळातच कसदार जीवनाची अनुभूती देणाऱ्या आहेत. जीवनाची अर्थपूर्णता पाहण्याची कुवत प्रतिभावंतांकडे असते म्हणूनच त्यांच्याकडे ग्रामीण कथेचे जनकत्व जाते. स्वानुभव, वास्तवता, पददलितांविषयी त्यांना वाटणारी सहानुभुती, कळकळ आणि आत्यंतिक जिव्हाळा, समाजोन्नतीची त्यांना वाटणारी ओढ, यामुळे माटे यांच्या कथेत प्रामाणिकपणा दिसून येतो. त्यामुळे त्याच कथा प्रत्ययकारी वाटतात.

वास्तवता हे त्यांच्या कथांचे आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे. या कथा काल्पनिक नाही तर वास्तवाच्या भक्कम पायावर उभ्या आहेत. बन्सी, सत्या, पिऱ्या, नामा, सई, तबा, पिराजी, नाथनाक आणि देवकाई ही सर्व माणसे माट्यांना भेटलेली आहेत. काही आसपास वावरणारी आहेत. कदाचित कथेत त्यांची नावे बदललेली असतील. पण खरीखुरी होऊन गेलेली ही माणसे आहेत. या उपेक्षितांच्या अंतरंगातील वेदनाही खरीखुरीच आहे. म्हणून कथा केवळ काल्पनिक नाही तर वास्तवावर आधारलेल्या आहेत असा निर्वाळा स्वतः माटे यांनी या पुस्तकाच्या प्रस्तावनेत दिला आहे. पुस्तकाच्या आरंभी मला थोडे सांगावयाचे आहे असे म्हणून ते लिहितात, "माझ्या गोष्टींना वास्तवाची म्हणजे सत्याची - भूमिका आहे' असे मी घोषित करीत असे. त्याचा खुलासा करावयास हवा. तसेच गोष्टीतील वस्तूंचा कल सामाजिकतेकडे आहे हे विधान स्पष्ट करायला हवे. 'बन्सीधर' या कथेतील मूळ सत्य एवढेच की, सुमारे ३० वर्षापूर्वी येथील नारायण पेठेतून एक मूलगा काहीं भटक्या लोकांनी पळवून नेला होता व सुमारे दीड-दोन वर्षांनी तळेगावच्या आसपास त्याने आपली सुटका करवून घेतली होती. हे बारीकसे वृत्त माझ्या मनात ठाण मांडून बसले. या वृत्तावरच या बन्सीधर या कथेची निर्मिती झाली आहे. सत्या रामवंशी याच्या गोष्टीतील बरीचशी कृत्ये अगदी खरीखुरी झालेली आहेत. पस्तीस एक वर्षापूर्वी या माणसाने सगळे कृष्णेचे खोरे दणाणून सोडले होते. निजामशाहीतच त्याला प्रथम पकडले होते व येथूनच तो निसटला होता. शेवटी एका स्त्रीने त्याचा घात केला. पुरंदरचा नामा व त्याच्या नात्याची माणसे यांचे सूक्ष्म मनोगत मला गडावर प्रत्यक्षात पाहावयास सापडले होते. तारळखोऱ्यातील पिऱ्याला मी लहानपणी पाहिले होते. थोरामोठ्यांनी त्याला हुलीवर घातले हे अक्षरशः खरे आहे. तारळखोऱ्यातील खंडोबाची जत्रा व तेथे पडणारा मातंगांचा जथ्था मी प्रत्यक्ष पाहिला आहे. सतीच्या शस्त्रातील 'सई' आमच्या आढीतील एका लहानशा चौकात उभी राहूनच गरजली होती! 'हास्याचा शोधा' तील लिफ्टमन मी मुंबईस पाहिला होता. त्याचे उदासवाणे ध्यान माझ्या चांगल्या परिचयाचे होते. तबा महाराची हकिकत अगदी खरी आहे. सावित्रीची कथा वासुदेव बळवंतच्या एका मित्राच्या करूणास्पद चरित्रातून उचललेली आहे. तिचे चारित्र्य व शेवटचे दुर्दैव म्हणजे प्रत्यक्ष घडलेली गोष्ट आहे. श्रीनिवासरावांच्या गोड निराशेतील हेलकरणीची हकिकत प्रत्यक्ष घडलेली आहे. डायरीतील पानातून आलेल्या अनेक हकिकती थोड्याफार फरकाने खऱ्याच आहेत. कीर्तनाची हकीकत एका महार गृहस्थाने सांगितली आहे. 'मनोराज्या'तील भाग प्रथम स्पष्टच होत आहे. नाथनाक व देवकाई यांची बलिदानाची हकिकत, 'अस्पृश्यांचा प्रश्न' या पुस्तकात सहासात ओळींमध्ये आराखड्याच्या रूपाने आली आहे. 'इंद्रायणीच्या वाळवंटात' ही प्रथमपुरुष स्पष्टच आहे" ❹(प्रा. श्री. म. माटे, 'उपेक्षितांचे अंतरंग', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती १९४१, पुनर्मुद्रण २००१, पृ. क्र. ४) वरील अवतरणावरून या सर्व कथा कल्पनिक नाही तर खऱ्याखुऱ्या आहेत हे स्पष्ट होते. पण याचा अर्थ असा नव्हे की कल्पकता यात आलेलीच नाही. वास्तवाला अधिकाधिक प्रकाशमान करण्यासाठी कल्पनेचा आधार घेतलेला अहे. साहित्य महटले की कल्पना येणारच. फक्त वास्तवाला कल्पनेपेक्षा प्रधान मानलेलें आहे. या सर्व कथा सुरुवातीला ना. सी. फडके यांच्या 'झंकार' या पत्रातून प्रसिद्ध झालेल्या आहेत. कालांतराने या सगळया कथा 'उपेक्षितांचे अंतरंग' या पुस्तकात संग्रहीत करून प्रकाशित करण्यात आल्या. माटे यांनी स्वतः या कथांना 'गोष्टी' या नावाने

संबोधले आहे. आधुनिक काळात मात्र त्यांना 'लघुकथा' म्हणणे अधिक संयुक्तिक वाटेल. तसेच 'ललित कथा' या नावाने संबोधले तरी फारसे वावगे ठरणार नाही. कथेचे नाविन्यपूर्ण चित्रण माटे यांनी केले आहे. यातील प्रत्येक माणसाशी त्यांचे एक नाते तयार झाले आहे.

ग्रामीण बोली भाषेचा वापर हे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य या कथांचे आहे. यातील निवेदन प्रमाण मराठी भाषेत असले तरी संवाद मात्र ग्रामीण बोली भाषेतच आहे. ही सर्व माणसे खेड्यापाड्यातील आहेत, रानावनात भटकणारी आहेत, दऱ्याखोऱ्यांमध्ये वस्ती करून राहणारी आहेत, तर काही गावकुसाबाहेर राहणारी अस्पृश्य माणसे आहेत. या सर्वांची भाषा अर्थातच ग्रामीण बोलीभाषा आहे. त्या त्या समाजाची ग्रामीण बोलीभाषा यात येताना दिसते.

अनाथ बन्सीच्या कथेत कातकऱ्यांची बोलीभाषा आहे, सत्याची भाषा ही रामोशांची बोलीभाषा आहे. पिऱ्या मातंगांच्या बोलीतून बोलतो, सावित्री उच्चवर्णीय ब्राह्मणांच्या भाषेतून बोलते, पुरंदरचा नामा शहाण्णव कुळी मराठा आहे, सतीच्या शस्त्रातील सई मर्द मराठ्याची पत्नी आहे. त्यामुळे ती लेचीपेची नाही. तिच्या स्वभावात आणि भाषेत एक प्रकारचा दणकटपणा आहे. एकूणच सर्व जाती-धर्माचा समावेश या कथांमध्ये आहे. त्यांच्यात साम्य इतकेच की ब्राह्मणांपासून ते तळागाळातील अस्पृश्यांपर्यंत आणि दरोडेखोरांपासून ते हेलकऱ्यापर्यंत ही सर्व माणसे उपेक्षित आहेत. वरिष्ठ समाजाकडून ती या ना कारणाने उपेक्षित राहिलेली आहेत. समाजव्यवस्थेकडून दुर्लक्षित झालेली आहेत. अशा माणसांचं अंतरंग श्री. म. माटे यांनी उघड करून दाखविलं आहे. या उपेक्षितांच्या अंतरंगाला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला आहे.

## सामाजिक मूल्यमापन -

श्री. म. माटे यांच्या 'उपेक्षितांचे अंतरंग' या ललित कथासंग्रहाला सामाजिक अधिष्ठान आहे. यातील सर्व कथांचा आशय सामाजिक आहे. माटे यांनी समाजाचा अभ्यास करून उपेक्षित राहिलेला जो समाज आहे त्यांच्या अन्यायाला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला आहे. सर्व जातीधर्मामधील हे उपेक्षित आहेत. ब्राम्हण, मराठा, मातंग, महार, चोर, दरोडेखोर, अनाथ, कातकरी, रामोशी अशा जातीजमातीतील उपेक्षितांवर माटे यांनी प्रकाश टाकला आहे. या कथा वाचल्यानंतर प्रत्येक जातीचा एक आलेख आपल्या डोळ्यासमोरून तरळून जातो. त्या त्या समाजामध्ये रूढ असलेल्या रूढी, परंपरा, विशिष्ट भाषा, लोकव्यवहार, जीवन जगण्याची रीत वाचकांच्या हृदयाला प्रत्यक्षपणे स्पर्श करून जाते. अस्पृश्य समाजावर उच्चवर्णीय समाजाकडून होणारा अन्याय बघितल्यानंतर वाचक अंतर्मुख होऊन जातो. आपल्या समाजव्यवस्थेबद्दल विचार करू लागतो. या माणसांचे जीवनविशेष तर ते जीवन दरिद्री व सामाजिक गुलामगिरी जगणाऱ्यांचे आहे. या जीवनाविषयी माटे अस्वस्थ होऊन लिहितात. "डॉ. श्रीराम गडकर यांनी श्री. म. माट्यांच्या कथांविषयी नोंदविलेला एक अभिप्राय अतिशय महत्त्वाचा आहे. *'त्यांच्या कथेतील पात्रे अतिशय दरिद्री, सामाजिक गुलामगिरीत जगणारी आहेत. त्यांच्या कथेमध्ये वास्तवाचा, सत्याचा आग्रह आहे ... दलितांच्या, उपेक्षितांच्या जीवनाविषयी श्री. म. माटे अस्वस्थ होऊन लिहितात; पण दलितांच्या, उपेक्षितांच्या दारिद्र्याला, भयाण परिस्थितीला जी सामाजिक विषमता, जी वर्णव्यस्था जबाबदार आहे. त्या परिस्थितीवर त्यांच्या कथेत प्रखर भाष्य येत नाही.'* हे असं भाष्य कोणत्याच दलितेतर कथाकारांच्या कथांमधून आलेलं नाही, येणार नाही. याचं कारण म्हणजे ही सहानुभुतीपोटी लिहिली गेलेली कथा आहे. व्यवस्थेने नागवलेले लोक एक दृश्य म्हणून ह्या कथाकारांना दिसले व हे दृश्य त्यांनी चित्रित केले; पण हे सगळे लेखक मात्र त्याच व्यवस्थेचे घटक होते. व्यवस्थेच्या आत राहून ते बाहेरच्यांचे चित्रण करीत होते, ही बाब लक्षात घेतली म्हणजे प्रा. डॉ. श्रीराम गडकर यांचे निष्कर्ष समर्पक वाटू लागतात." ❺ (सुधाकर शेलार, दलित व दलितेतरांची कथा : एक अभ्यास' (डॉ. श्रीराम गडकर), नवीन उद्योग प्रकाशन, १०२०, भवानी पेठ, पुणे. ४११००२. प्रथमावृत्ती : ३ जानेवारी २०१३, पृ. क्र. तेरा) 'बन्सीधरा! तू आता कुठे रे जाशील?' या कथेत कातकरी समाजाची जीवनपद्धती आली आहे. त्यांच्या सामाजिक समजुती लक्षात घेतल्यानंतर त्यांची सामाजिक उत्क्रांती कुठवर आली आहे याचा अंदाज येतो. भटक्या-विमुक्त अवस्थेमध्ये जगणारे कातकरी आपले जीवन कसे जगतात याचा प्रत्यय कातकऱ्यांच्या तळावरून येतो. गावाबाहेर वस्ती करून राहणारी ही जमात कधी कधी ओढ्याच्या काठावर, माळरानावर तळ करून राहते.

रानावनात भटकंती करून रानटी न झालेले व म्हणून अनाथ बन्सीला आधार देण्याइतपत मानवता त्यांच्याजवळ शिल्लक आहे. कातकऱ्यांच्या समाजजीवनाचे चित्रण 'बन्सीधरा! तू आता कुठे रे जाशील?' या कथेतून आपणास वाचावयास मिळते.

'कृष्णाकाठचा रामवंशी' सत्या हा लौकीकदृष्ट्या दरोडेखोर असला तरी त्याची भूमिका उदात्त आहे. या रामोशी लोकांची ज्यांना माहिती आहे ते मान्य करतील की, या जमातीची भावनात्मक उन्नती चांगलीच झालेली आहे. पण प्रस्थापित संस्कृतीत विलीन होण्याची तयारी ही जमात अजूनही दाखवत नाही. रामोशी लोक आपली परंपरा थेट श्रीरामापर्यंत मागे नेऊन भिडवतात. 'आपण चोर नव्हे' ही सत्याची गर्जना आणि मागल्या काळात आपण समाजातील आवश्यक व उपयोगी माणसे होतो ही समाजास त्याने करून दिलेली आठवण आपण सर्वांनीच ध्यानात ठेवावयास हवी.

'पुरंदरच्या नामाने' सांगितलेली त्याची गृहस्थिती, लग्नाच्या बाबतीतील त्याचा कुलीनत्वाचा आग्रह आणि त्याचे ऐतिहासिक वैभवाचे स्फुरण हे मराठा समाजातील लक्षावधी माणसांच्या मनातील चलबिचलीचे खरेखूरे निदर्शक आहे असे वाटते.

'तारळखोऱ्यातील पिऱ्या'चे सामाजिक उत्थान कोणत्या प्रकारचे आहे हे त्या कथेतील पहिल्या परिच्छेदात आले आहे. काहीतरी मोठे करावे ही त्याची भूक आणि खंडोबावरची त्याची निष्ठा लक्षात घेण्यासारखी आहे. अशा लोकांच्या धाडसी प्रवृत्तीचा फायदा समाजातील सुस्त लोक कसा घेतात हे त्याच्या तोंडून आले आहे आणि ते रास्त आहे. सईने स्वाभिमान रक्षणासाठी राखून ठेवलेला नवऱ्याचा जोडा मान खाली घालून जगणाऱ्या सर्वत्र अवमानीत स्त्रियांनी ध्यानात ठेवण्यासारखा आहे.

'तबा महारा'चे मनोगत हे महार समाजाच्या मनाचे स्पष्ट निदर्शक आहे. डायरीच्या पानातील पाण्याच्या संबंधीचे आक्रंदन समाजात अजूनही तसेच आहे. साध्या भूतदयेचे आवाहन सुद्धा समाजाच्या मनाला पोहोचत नाही. समाजातील वर्णव्यवस्थेवर, विषमतेवर या कथेतून प्रकाश टाकला आहे. अस्पृश्य समाजाला सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरू दिले जात नाही. कीर्तनातही त्यांना अडगळीच्या जागेवर बसावे लागते. यातून त्या समाजातील अन्यायाची प्रखरता लक्षात येते.

'नाथनाक व देवकाई' यांचे बलिदान मनावर विलक्षण आघात करते. कोळी व महार समाजातील अज्ञानाचा फायदा घेऊन, त्यांना एकमेकांविरूद्ध चिथावणी देऊन दादा मलिक आपला हेतू साध्य करवून घेतो. तत्कालीन समाजातील नरबळी देण्याची पद्धत ही अंधश्रद्धेतून निर्माण झाली आहे. इंद्रायणी तीराच्या आत्मगत भाषणातील 'सामाजिक' थोडे सूक्ष्म आहे. एकूणच या सर्व कथांना सामाजिक अधिष्ठान आहे. या कथा सामाजिक आहेत. मानवी समाजात असणारे विविध स्तर त्यातून जाणवत असणाऱ्या त्यांच्या वेदना क्वचित प्रसंगी त्यांनी केलेला विद्रोह या कथांमधून जाणवतो.

## 'उपेक्षितांचे अंतरंग' मधील व्यक्तिचित्रे -

'उपेक्षितांचे अंतरंग' हे व्यक्तिचित्रणात्मक ललित गद्य आहे. स्वतः माटे यांनी त्यांना 'गोष्टी' या नावाने संबोधले असले तरी या व्यक्तिचित्रणात्मक 'ललित कथा' आहेत. प्रत्येक कथा एकेका व्यक्तिभोवती गुंफलेली आहे. 'बन्सीधर! तू आता कोठे रे जाशील?' यातील बन्सी, 'कृष्णाकाठचा रामवंशी' मधिल सत्या रामोशी, पुरंदरचा नामा, तारखोऱ्यातील पिऱ्या, 'सतीचे शस्त्र' यातील सई, 'कशाचा संसार' मधील तबा, मुक्याने मेलेली सावित्री, अस्पृश्याच्या डायरीतील पिराजी, नायनाक व देवकाई इ. व्यक्तिरेखा श्री. म. माटे यांनी या कथांमधून साकार केल्या आहेत. या व्यक्तिरेखांचं महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे या सर्व व्यक्तिरेखा समाजाकडून उपेक्षिल्या गेलेल्या आहेत. या उपेक्षितांचे अंतरंग उलगडून दाखविण्याचा प्रयत्न श्री. माटे यांनी केला आहे. या संदर्भात डॉ. श्रीराम गडकर म्हणतात की, "मराठी कथेमध्ये प्रा. श्री. म. माटे उपेक्षितांच्या अंतरंगात प्रवेश करेपर्यंत दलितांच्या दुःखाचे, त्यांच्या जीवनातील पडसाद तीव्रतेने उमटले नाहीत. बन्सीधर, कृष्णाकाठचा रामवंशी, तारळ खोऱ्यातील पिऱ्या, नाथनाक, देवकाई इ. व्यक्तिचित्रे रेखाटून प्रा. श्री. म. माटे यांनी अतिशय परिणामकारक रीतीने उपेक्षितांच्या, दलितांच्या वेदनेला बोलके केले. सामाजिक विषमता, दलितांचा छळ पाहून त्यांचे मन माणुसकीच्या गहिवराने

काठोकाठ भरून जात होते. त्यांना सतत असे वाटे की, दलितांना, उपेक्षितांना चांगला काळ येईल. आपल्या कथेतून दलितांना सहानुभूती मिळवून देण्याच्या प्रयत्नात प्रा. श्री. म. माटे यशस्वी झाले. मराठी साहित्यात, मराठी कथेत कधीही न आलेला हा दलित माणूस आपल्या कथेतून सजीव-साकार केला. अत्यंत सहानुभूतीने, जिव्हाळयाने, जाणीवपूर्वक 'उपेक्षितांच्या अंतरंगा'त शिरणारे प्रतिभासंपन्न कथाकार प्रा. श्री. म. माटे यांनी दलितेतर कथाकारांमध्ये दलितांच्या दुःखाला सर्वात प्रथम वाचा फोडली. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील लेखक हा पांढरपेशा होता व पांढरपेशांमधील मध्यमवर्गीय जीवनचित्रण हाच त्यांचा विषय होता. दलित, उपेक्षित हे कथेचे विषय होऊ शकतात हे पांढरपेशा लेखकांच्या लक्षात येत नव्हते. पण प्रा. श्री. म. माटे यांनी मात्र एक समाजशास्त्रज्ञ म्हणून सहानुभूतीने, जिव्हाळयाने, माणुसकीच्या गहिवराने, तळमळीने, सामाजिक जाणिवेने दलितांचे, उपेक्षितांचे जीवनचित्रण आपल्या कथांमधून केले आहे." ❻ (डॉ. श्रीराम गडकर, 'दलित व दलितेतरांची कथा : एक अभ्यास' नवीन उद्योग प्रकाशन, १०२०, भवानी पेठ, पुणे. ४११००२. प्रथमावृत्ती : ३ जानेवारी २०१३, पृ. क्र. २२५) डॉ. श्रीराम गडकर यांचे हे निरीक्षण अतिशय महत्वपूर्ण आहे.

'बन्सीधरा! तू आता कुठे रे जाशील?' या कथेत अनाथ बन्सीची करूण कहाणी आलेली आहे. अतिशय हृदयद्रावक पद्धतीने कथेचे कथानक गुंफले आहे. आई व बोट धरून बाजारात गेलेला बंछी तेथे चुकतो. तेथे मायलेकरांची ताटातूट होते. तेथून तो कातकऱ्यांच्या तळावर येतो. चिम्या आणि तुळशी त्याला आश्रय देतात. देवाचा बाळ म्हणून त्याचा सांभाळ करतात. पण बंछीचे मन तेथे रमत नाही. शेवटी भटकंती करीत करीत तो आपल्या पूर्वीच्या घरी येतो. वडीलांची भेट होते पण आई भेटत नाही कारण वडीलांनी आईचा त्याग केलेला असतो. आई व वडील दोघांनीही दुसरा विवाह केलेला असतो. दुसऱ्या आईचा आणि दुसऱ्या वडीलांच्या सानिध्यात न रमणारा बंछी अखेरीस कातकऱ्यांच्या तळाची वाट धरतो. पण नियती नावाची अदृश्य शक्ती त्याचा पाठलाग सोडीत नाही. कारण कातकऱ्यांच्या तळावर पोलीस शिपायांनी धाड टाकलेली असते व संपूर्ण तळ उदध्वस्त झालेला असतो. शेवटी अनाथ असलेला बन्सी अखेरपर्यंत अनाथच राहतो. प्रत्येक ठिकाणी आधार शोधायला गेलेला बंछी अखेरपर्यंत अनाथच राहातो. प्रत्येक ठिकाणी आधार शोधायला गेलेला बंछी प्रत्येक ठिकाणी निराधार होत जातो. नियतीची काळीकुट्ट छाया त्याच्या जीवनावर पडलेली दिसते. त्याची करूण कथा अंतर्मुख केल्याशिवाय राहत नाही. शेवटी माट्यांच्याच शब्दात सांगायचे झाले तर "माझ्या गोड बन्सीधरा ! तू आता कुठे रे जाशील?"

'कृष्णाकाठचा रामवंशी' असणारा सत्या रामोशी, दरोडेखोर असला तरी त्याची भूमिका अतिशय प्रांजळ आहे. श्रीमंतांच्या घरावर दरोडा टाकून तो गोरगरीबांना वाटून टाकतो. श्री. म. माटे यांचा सत्या रामोशी वाचताना अण्णाभाऊ साठे यांच्या 'फकिरा'ची आठवण येते. गोरगरिबांविषयी कनवाळू असणारा सत्या श्रीमंतांच्या उदारतेचीही कदर करतो. म्हणूनच इंदापूरकरांच्या सावित्रीबाईला तो आपली बहीण मानतो. घरी आलेल्या पाहुण्यांप्रमाणे दरोडेखोरांचं आदरातिथ्य करणाऱ्या सावित्रीबाईना तो साष्टांग दंडवत घालतो. "सावित्रीबाई, तू खरी सावित्री, आमाला दूध भात घातला; देव तुझं कल्याण करू दे. मी तुझा भाऊ हाय; तू माजी भन हाईस; वेळवकत पडला तर हाक मार" असे म्हणणाऱ्या सत्याच्या दरोडेखोराला मन असते, भावना असतात हे दाखवून दिले. सत्याच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू आहेत. कृष्णा नदीच्या खोऱ्यात फिरणारा आडदांड सत्या, इंदारपूरकरांच्या वाड्यावर भावनाशील झालेला सत्या, शाळेतील मुलांना मोफत मिठाईचे वाटप करणारा सत्या, बाजारपेठेतील जोंधळा लुटून गोरगरीब शेतकऱ्यांना मोफत वाटणारा सत्या, पोलीस शिपायांच्या हातावर तुरी देऊन पसार होणारा सत्या, तुरूंगात वाघासारखी डरकाळी फोडणारा सत्या आणि अखेरीस "आमी चोर न्हाई! आमी परबू रामचंद्राचं चाकूर हाऊत' असे आक्रंदन करणारा सत्या असे विविध पदर सत्याच्या व्यक्तिमत्त्वाला आहेत.

'तारळखोऱ्यातील पिऱ्या' हा एक आगळावेगळा माणूस आहे. तो धाडसी प्रवृत्तीचा आहे. समाजातील सर्वात खालच्या स्तरात जन्मलेला पिऱ्याला काहीतरी मोठे करून दाखवायचे आहे. थोरामोठ्यांनी हुलीवर घातल्यामुळे त्याने खून केला. त्यामुळे पोलीस शिपायांचा पाठलाग चुकवत चुकवत तो रानोमाळ तारळखोऱ्यात भटकतो. इतर माणसांपेक्षा तो वेगळा आहे. तो समाजाने मातंग असल्यामुळे मुळातच शूर आहे. तो फरारी आहे. त्याच्या शोधार्थ पोलीस लोक सगळीकडे फिरत असतात. दहा हजार माणसांमध्ये उठून दिसावं असं त्याचं व्यक्तिमत्त्व होतं. त्याच्या वाट्याला आकर्षक किंवा सुबक सौंदर्य आलेलं नव्हतं तर सृष्टीने आपल्या जवळचं सगळं उग्र वैभव त्याला दिलेलं

होतं. हाडापेराने मजबूत असणारा पिऱ्या ठेंगणा-ठुसका होता. रानचा वारा सतत पित असल्यामुळे आरोग्य आणि चपळपणा त्याच्या मुद्रेवर स्पष्ट दिसत असे. त्याच्या जातीचे प्रमुख लक्षण जे लाल डोळे ते त्याला अधिकच लालबुंद लाभलेले असल्यामुळे लांडग्याला सुद्धा भय वाटावे असे त्याचे डोळे होते. पिऱ्या खिलाडू वृत्तीचा होता. आपल्याला पकडायला आलेल्या नायकाची तो वरचेवर मस्करी करी. चंद्राबाई त्याला शोभेल अशीच त्याची अर्धांगिनी होती. ती त्याला कधी एकटे सोडत नसे. पालीचा खंडोबा हे अखिल मातंग समाजाचे कुलदैवत! पिऱ्याही खंडोबाचा एकनिष्ठ भक्त होता. असा हा पिऱ्या शेवटी पालीला खंडोबाच्या यात्रेत पकडला जातो.

'पुरंदरचा नामा' पुरंदर किल्ल्यावर प्रवाशांचं ओझं वाहून नेण्याचं काम करीत असतो. तो उच्चकुलीन असून शहाण्णव कुळी मराठा आहे आणि त्याचा त्याला रास्त अभिमान आहे. मोठ्या अभिमानाने तो आपल्या कुळाची थोरवी सांगत असतो. आपल्या आजोबांनी पुरंदरच्या लढाईत मोठा पराक्रम गाजवला तेव्हा शिवाजी महाराजांनी किल्ल्याच्या आसपासचा परिसर त्यांना बक्षिस दिला असे तो अभिमानाने सांगतो. पण कालांतराने पूर्वीचे वैभव न झाले. जमिनी गहाण पडल्या आणि नामाला पोट भरण्यासाठी त्याच किल्ल्यावर हमालाचे काम करावे लागते. ज्या किल्ल्यावर वाडवडिलांनी फुले वेचली त्याच किल्ल्यावर नामाला गोवऱ्या वेचायची पाळी आली. नशिबाचे भोग त्याला भोगावे लागले. पण असे असले तरी तो स्वाभिमानी आहे. लग्न जमत नाही म्हणून कुलधर्म-कुलाचार टाळणे त्याला जमत नाही. तो म्हणतो, "काका आम्ही शहाण्णव कुळीचं मराठं, सोयरीक हाकडं तकडं करून कसं चाललं? आमाला ही अशी दशा येऊ द्या पण कुळाला बट्टा नाही लावणार!" या विधानावरून नामाचा स्वाभिमानी बाणा प्रत्ययास येतो. मोडेल पण वाकणार नाही असे शहाण्णव कुळीचे वैशिष्ट्य नामात सार्थ आहे.

'सई' ही एक विधवा स्त्री आहे. दोन वर्षापूर्वी तिचा नवरा रामा भिंगारे वारला. तो मोठा मर्द मराठा माणूस होता. सई विधवा झाली पण तिने कुणासमोर हात पसरविला नाही. उदरनिर्वाहासाठी तिने मोलकरणीचे काम पत्करले. ती कुणावरही अवलंबून राहत नाही. कोणाच्या दयेवर ती जगत नाही. ती स्वावलंबी आहे तशी स्वाभिमानी पण आहे. साधे, शांत जीवन ती सरळमार्गाने जगत असते. कुणाच्या वाट्याला जात नाही पण जर कुणी तिच्या वाट्याला गेले तर ती त्याची हयगय करीत नाही. बाळा गवंड्यासारख्या रंगेल माणसाची ती चांगली जिरवते. बाळा गवंडी जेव्हा तिच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन अश्लील चावटपणा करतो तेव्हा ती दुर्गावतार धारण करते. एकूणच अन्यायाला वाचा फोडणारी, जशास तसे उत्तर देणारी सई प्रचंड स्वाभिमानी आहे.

'मुक्याने मेलेली सावित्री' या कथेत  सावित्रीची दर्दभरी कहाणी आहे. हृदय पिळवटून टाकणारी तिची शोकांतिका मनाला चटका लावून जाते. पद्माकर हा सावित्रीचा पती भूमिगत क्रांतीकारक असल्यामुळे इंग्रज सरकार त्याला अंदमानाच्या तुरंगात वीस वर्षाची काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावते. पतीच्या पश्चात ती उत्तमप्रकारे घर सांभाळते. रामाचे शिक्षण पूर्ण करते. पद्माकर शिक्षा पूर्ण करून परत येतो. पण पुण्यातील प्लेगने सावित्रीचा मृत्यू होतो. लग्न झाल्यावर ती मुक्यानेच घरात येते. शेवटपर्यंत पतीशी न बोलता मुक्यानेच मरते. मुक्याने मेलेली सावित्री हे शीर्षक सार्थ आहे. अशीही सावित्री घरावर प्रेम करणारी, रामावर संस्कार करणारी, पद्माकरवर मनापासून प्रेम करणारी, पतीची आतुरतेने वाट बघणारी आणि दुर्दैवाने प्लेगच्या साथीत भस्मसात होणारी सावित्री. अशी तिची अनेक रुपे कथेत दिसतात.

'कशाचा संसार' या कथेत तबा महाराच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला आहे. मोलमजुरी करून तो आपला उदरनिर्वाह करतो. त्याची बायको मंजुळा संसाराला हातभार लावते. तबाचे एक दुःख त्याला सारखे टोचत असते. ते म्हणजे त्याची बायको व त्याचे काम वेगवेगळया ठिकाणी आहे. त्यामुळे त्यांना प्रेमाचे दोन शब्द बोलता येत नाहीत. माटे मास्तरांच्या मदतीने त्यांना एका ठिकाणी काम मिळते व त्यांचा संसार सुरळीत होतो. तबाप्रमाणेच पिराजी हाही असाच एक अस्पृश्य नायक आहे. त्याला गावातील तराळकीची कामे करावी लागतात. साहेब गावात आल्यावर दवंडी देण्याचे व लाकडे फोडण्याचे काम त्याला करावे लागते. जागोजागी त्याला अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागतात. त्याच्या मुलीला गावातील पाणवठ्यावर पाणी भरू दिले जात नाही. कीर्तन ऐकण्यासाठी त्यांना अडगळीच्या जागेवर बसावे लागते. पिराजी लाचार आहे, त्याला गावात गुलामगिरीसारखे जीवन जगावे लागते.

अशी अनेक व्यक्तिचित्रणे 'उपेक्षितांचे अंतरंग' या ललित कथासंग्रहात आलेली आहेत. अनाथ बन्सी, गोरगरीबांना मदत करणारा सत्या, रामोशी, कुळाचा अभिमान बाळगणारा पुरंदरचा नामा, रानावनात फरारी

होऊन भटकणारा तारळखोऱ्यातील पिऱ्या, स्वावलंबी आणि तितकीच स्वाभिमानी सई, मुक्याने मेलेली सावित्री, प्रामाणिक कोयनाबाई, गरीब बिचारा तबा, अस्पृश्यतेचे चटके सहन करणारा पिराजी, संपत्तीच्या मोहापायी पोटच्या मुलांना जमिनीत गाडणारा बहिरनाक, पोटच्या मुलांप्रमाणे बंछीवर प्रेम करणारे चिम्या व तुळशी, धूर्त व बेरकी दादा कलम, सत्याचा विश्वासघात करणारी रुक्मिणी, पिऱ्यावर जीव ओवाळून टाकणारी चंद्रा. अशा अनेक छोट्यामोठ्या व्यक्ती वाचकांच्या काळजाचा ठाव घेतात. श्री. म. माटे यांची ही उपेक्षित माणसे मनाला चटका लावून जातात. "काही दलितेतर कथाकारांनी दलित जीवनाचे जे चित्रण केले त्या पाठीमागे महात्मा गांधी, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व इतर समाजसुधारकांनी दलितांचे दुःख कमी करण्यासाठी जे प्रयत्न केले त्याची प्रेरणा आहे. काही दलितेतर कथाकारांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा व कार्याचा प्रभाव असल्याचे लक्षात येते. तरीही दलितेतर कथाकारांना दलित जीवन चित्रण करताना काही मर्यादा येतात असे लक्षात येते. उदा. स्वानुभवाची कमतरता, दलित जीवनाचा अनुभव कल्पनेच्या पातळीवर किंवा ऐकलेला-वाचलेला, विद्रोहाची कमतरता, वैचारिक धरसोड, भूतदयावादी वृत्ती, इ. ... दलितेतर कथाकारांनी केलेल्या दलित जीवनचित्रणाबद्दल खंडणमंडन करता येईल. पण कमी-अधिक प्रमाणात का होईना दलितेतर कथाकारांनी आपल्या कथेतून दलितांचे जीवनचित्रण केले ही घटना अतिशय महत्त्वपूर्ण आहे असे लक्षात येते. हे जीवनचित्रण अगदीच अवास्तव आहे असे नाही. मात्र एकूण दलित साहित्यामागे असणाऱ्या प्रेरणा इथे कार्यरत नसल्यामुळे या कथांमध्ये दलितांचे जीवणचित्रण एका तटस्थतेच्या पार्श्वभूमीवर झाल्यासारखे वाटते. दलितेतर कथाकारांची दलित कथा प्रश्नांचे चित्रण करते पण त्याच्या सोडवणुकीचा मार्ग सहसा दाखवत नाही. या कथेत वेदना येते पण विद्रोह येत नाही."❼ (डॉ. श्रीराम गडकर, 'दलित व दलितेतरांची कथा : एक अभ्यास' नवीन उद्योग प्रकाशन, १०२०, भवानी पेठ, पुणे. ४११००२. प्रथमावृत्ती : ३ जानेवारी २०१३, पृ. क्र. २८८) शेवटी अंतर्मुख करायला लावण्याचं सामर्थ्य त्यांच्या उपेक्षितांच्या अंतरंगात आहे. म्हणूनच हे पुस्तक वाङ्मयीनदृष्ट्या निसंशय श्रेष्ठ आहे.

## 'उपेक्षितांचे अंतरंग' ची भाषा शैली -

'उपेक्षितांचे अंतरंग' यातील सर्व कथांच्या यशस्वितेचे गमक त्यातील ग्रामीण भाषेत आहे. श्री. म. माटे यांनी निवेदनासाठी प्रमाणभाषा तर संवादासाठी ग्रामीण भाषेचा वापर केला आहे. यातील सर्व कथांमध्ये श्री. म. माटे यांनी बोली भाषेचा वापर चपखलपणे केला आहे. ग्रामीण साहित्यात 'बनगरवाडी', 'गोतावळा', 'धग', 'पाचोळा' 'गांधारी', 'सर्जा' इ. कादंबऱ्यात ग्रामीण भाषेचा वापर चांगल्या प्रकारे केला आहे. ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, आदिवासी साहित्य हे भाषेच्या वेगळया शैलीमुळे नावारुपाला आले. साठोत्तरी वाङ्मयात वरील साहित्य प्रवाह विशिष्ठ वाङ्मयीन ठसा उमटवू शकले ते प्रामुख्याने बोली भाषेमुळेच! स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात मात्र अतिशय थोड्या लेखक-कवींनी ग्रामीण बोलीचा वापर केला. त्यात लक्ष्मणराव सरदेसाई, ग. ल. ठोकळ, बहिणाबाई चौधरी, र. वा. दिघे, श्री. ना. पेंडसे, बा. भ. बोरकर, श्री.म. माटे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो.

अशा पार्श्वभूमीवर 'उपेक्षितांचे अंतरंग' हे श्री. म. माटे यांचे ललित कथासंग्रहाचे पुस्तक आपल्या ग्रामीण भाषेच्या वापरामुळे उठून दिसते. या उपेक्षित माणसांची उपेक्षित भाषा जेव्हा आपण वाचतो तेव्हा तो माणूस आणि त्याची वेदना आपल्या हृदयाला स्पर्श करते. सर्व समाजाची पण उपेक्षित असलेली ही माणसे जेव्हा त्यांच्या त्यांच्या भाषेत बोलतात. तेव्हा ती आपल्या डोळयापुढे उभी राहतात. ब्राह्मण, मराठा, महार, मातंग, रामोशी, कातकरी, अशा विविध जाती-जमातींची ही माणसे ग्रामीण बोली भाषेतून संवाद साधतात. यातील सर्व कथा ग्रामीण आहेत. त्यांचा नायक हा खेड्यापाड्यांतून, डोंगरदऱ्यातून वावरणारा आहे. त्यांच्या तोंडी ग्रामीण भाषा औचित्यपूर्ण वाटते. प्रमाणभाषेचा वापर केला असता तर ही माणसं जिवंत वाटली नसती. कृष्णाकाठचा रामवंशी, तारळखोऱ्यातील पिऱ्या, कातकरी, पुरंदरचा नामा ही माणसे रानावनात भटकणारी आहेत. श्री. म. माटे यांनी या माणसांच्या संवादासाठी ग्रामीण बोलीभाषा वारपल्यामुळे ती चैतन्यदायी वाटतात.

'बन्सीधरा! तू आता कुठे रे जाशील?' या कथेत कातकऱ्यांच्या तळाचे इतके हुबेहूब वर्णन आले आहे की ओढ्याच्या काठावरील तो तळ साक्षात आपल्या डोळयापुढे उभा राहतो. यात कातकऱ्यांची भाषा आली आहे. एके ठिकाणी चिम्या तुळशीला म्हणतो, "कुणाचं प्वॉर आन् कुठं पडलया! कारभारणी ह्याला नीट सांभाळ, आपुन काय

पातक केलं? म्हादेवाच्या डोंगरावर वांदरं मारुन खाल्ली, काय र नशिबा! प्वॉरं पटापटा मराया लागली" असं म्हणून चिम्यान कपाळ बडवून घेतलं. तो तुळशीला म्हणतो, 'कारभारणी! हे बघ ह्या देवमाणसाला नीट सांभाळ, आग! ह्यो देवाचा बाळ हाई; ह्याला घवाचा तुकडा घाल, मास्कांड घालू नगं!" कातकऱ्यांच्या बोलीतील संवादामुळे ही पात्रे जिवंत वाटतात. या ठिकाणी नागर भाषेचा वापर केला असता तर चिम्या आणि तुळशीचा संवाद वाचकांना भिडला नसता. अशा अनेक ठिकाणी श्री. म. माटे यांनी ग्रामीण बोलीभाषेचा वापर केला आहे. सत्या रोमोशी आणि त्याचे चार सवंगडी धोंड्या, यल्लप्पा, पांड्या, नरसू, रामोशी भाषेतून बोलतात. "आम्ही चोर नव्हे" ही सत्याची शेवटची गर्जना हृदयाला आरपार छेदून जाते इतकी समर्थ त्याची भाषा आहे. तारळखोऱ्यातील पिऱ्याची पत्नी म्हणते, "माझ्या अंगाला जर का कुणी बॉट लावलं तर चेपलीखाली त्याला असा मारीन की पाणी मागू द्यायची न्हाई". काही मोजक्या ग्रामीण शब्दांच्या फटकाऱ्यात चंद्राबाईचं व्यक्तिमत्त्व डोळ्यासमोर उभं राहतं. हे वाक्य वाचल्याबरोबर चंद्राबाईनं दिलेला चपलेचा तडाखा साक्षात दिसतो. यावरून ग्रामीण बोलीभाषेत असलेलं शब्दाचं सामर्थ्य जाणवल्याशिवाय राहत नाही. 'सतीचे शस्त्र' मधील सई रगेल आणि रंगेल असणाऱ्या बाळा गवंड्यावर डाफरते. तिची भाषा रांगडी आहे. फाजिलपणा करणाऱ्या बाळा गवंड्याला घायाळ करण्याचे सामर्थ्य तिच्या भाषेत आहे. 'ए मुडद्या, लई फाजिलपणा चालविलास! त्वांड लई चुरुचुरु करतंया! मी जातीची मराठीण हाय, मर्दाची अस्तुरी हाय, तुझं थोबाड फोडल्याबिगर सोडायची नाय." साक्षात दुर्गावतार धारण करणारी सई ग्रामीण भाषेतून बोलते म्हणून तिच्या शब्दांना एक वेगळे परिमाण प्राप्त होते. पुरंदरचा नामा "काका, आमी शहाण्णव कुळीचं मराठं, सोयरिक हाकड-तकडं करुन तसं चालंल? आमाला ही अशी दशा येवू द्या पण कुळाला बट्टा नाही लावणार!" असे जेव्हा म्हणतो तेव्हा त्याच्या शब्दातून त्याच्या कुळाचा अभिमान व्यक्त होतो. सावित्रीची भाषा ब्राह्मणी परंपरेतील असून सुसंस्कारशील आहे. 'कशाचा संसार' मधीलै तबा व मंजुळेच्या भाषेत आर्जव आहे, विनंती आहे. खेड्यापाड्यातील प्रामाणिकपणा त्यांच्या भाषेत आहे. "साल्या लाकडं तुझ्या बानं फोडायची का?" असे पिराजीला ऐकावे लागते ते केवळ तो अस्पृश्य आहे म्हणून!

ग्रामीण भाषेला मराठी साहित्यात प्रविष्ठ करण्याचे महान कार्य श्री. म. माटे यांनी केले. दलित साहित्याचा जन्मही झालेला नव्हता आणि ग्रामीण साहित्य भरभराटीला आले नव्हते अशा स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात माटे यांनी इ.स. १९४१ साली ग्रामीण दलित भाषा आग्रहीपणे मांडली.

उपेक्षितांच्या भाषेला कथेत स्थान मिळाल्यामुळे उपेक्षितांच्या अंतरंगातील वेदनेचा आलेख समर्पकरित्या मांडला गेला. त्यांच्यावर झालेला अन्याय काळजाचा ठाव घेतो. नागर व ग्रामीण भाषेच्या मिश्रणामुळे वास्तवाचे सौंदर्य व ग्रामीण भाषेचे राकट माधुर्य 'उपेक्षितांचे अंतरंग' या ललित कथासंग्रहाला लाभले आहे. बोलीभाषा हा या कलाकृतीचा आत्मा आहे. श्री. म. माटे यांच्या लेखणीचे ते वैशिष्ट्य आहे. एकूणच या साहित्यकृतीचे संपूर्ण बळ ग्रामीण बोलीभाषेतच एकवटलेले आहे.

## संदर्भ -


१) डॉ. वासुदेव मुलाटे, 'ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास', साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद. प्रथमावृत्ती - जानेवारी १९९२, पृ. क्र. १४, १५

**२**) डॉ. योगेंद्र मेश्राम, 'दलित साहित्य : उद्गम आणि विकास', मंगेश प्रकाशन, नागपूर. प्रथम आवृत्ती - ११ मे १९९८, पृ. क्र. १५०

३) इंदुमती शेवडे, 'मराठी कथा : उगम आणि विकास', सोमैया पब्लिकेशन्स, मुंबई, संक्षिप्त व सुधारित आवृत्ती १९८२, पृ. क्र. १५२

४) प्रा. श्री. म. माटे, 'उपेक्षितांचे अंतरंग', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती १९४१, पुनर्मुद्रण २००१, पृ. क्र. ४

५) प्रो. डॉ. सुधाकर शेलार, दलित व दलितेतरांची कथा : एक अभ्यास' (डॉ. श्रीराम गडकर), नवीन उद्योग प्रकाशन, १०२०, भवानी पेठ, पुणे. ४११००२. प्रथमावृत्ती : ३ जानेवारी २०१३, पृ. क्र. तेरा

६) डॉ. श्रीराम गडकर, 'दलित व दलितेतरांची कथा : एक अभ्यास' नवीन उद्योग प्रकाशन, १०२०, भवानी पेठ, पुणे. ४११००२. प्रथमावृत्ती : ३ जानेवारी २०१३, पृ. क्र. २२५
७) डॉ. श्रीराम गडकर, 'दलित व दलितेतरांची कथा : एक अभ्यास' नवीन उद्योग प्रकाशन, १०२०, भवानी पेठ, पुणे. ४११००२. प्रथमावृत्ती : ३ जानेवारी २०१३, पृ. क्र. २८८